# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

---

प्रेसनोट

## 'पीएमपीएमएल' कडून "तुकाराम बीज" निमित्त देहूगाव साठी जादा बसेसचे नियोजन

बुधवार दि. २७/०३/२०२४ रोजी "तुकाराम बीज" असल्याने जगद्‌गुरू श्री तुकाराम महाराज यांचे दर्शनासाठी देहूगाव येथे मोठ्या प्रमाणात यात्रा भरते. तुकाराम बीज निमित्त पुणे व पिंपरी चिंचवड शहर तसेच उपनगरांतून देहूगाव येथे जाणाऱ्या भाविकांच्या व प्रवाशी नागरिकांच्या सोयीसाठी दरवर्षी प्रमाणे यंदाही परिवहन महामंडळामार्फत जादा बसेसची व्यवस्था नेहमीच्या तिकीट दराने करण्यात येत आहे.

**देहूगाव व आळंदी साठी जादा बसेसची व्यवस्था करण्यात आलेल्या स्थानकांची/ठिकाणांची माहिती खालीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र. | बसमार्गाचे नाव | स्थानकाचे नाव |
|---|---|---|
| १ | स्वारगेट ते देहूगाव | स्वारगेट व देहूगाव स्थानक |
| २ | मनपा भवन ते देहूगाव | मनपा भवन व देहूगाव स्थानक |
| ३ | मनपा भवन ते आळंदी | मनपा भवन व आळंदी स्थानक |
| ४ | देहूगाव ते आळंदी | देहूगाव व आळंदी स्थानक |
| ५ | स्वारगेट ते आळंदी | स्वारगेट व आळंदी स्थानक |
| ६ | पुणे स्टेशन ते देहूगाव | पुणे स्टेशन डेपो व देहूगाव स्थानक |
| ७ | निगडी ते देहूगाव | निगडी व देहूगाव स्थानक |
| ८ | हडपसर ते आळंदी | हडपसर व आळंदी |

तसेच देहूगाव येथून परतीच्या प्रवासासाठी देहूगाव येथील झेंडे मळयाजवळ मिलिटरी परिसरातील उजव्या बाजूच्या मोकळ्या जागेत परिवहन महामंडळाचे तात्पुरते बसस्थानक उभारण्यात असून सदर ठिकाणाहून वरील जादा बसेसची व्यवस्था करण्यात आलेली आहे. तसेच देहूगाव ते आळंदी दर्शन जाण्याकरीता देहूगाव-आळंदी रस्त्यावर गाथा परिसरातील जगद्‌गुरू संत तुकाराम महाराज क्रिडांगणाजवळील गायरानाच्या मोकळया जागेतून जादा बसेस सोडण्यात येतील.

उपरोक्त प्रमाणे जादा बसेसची व्यवस्था दि. २६/०३/२०२४ ते दि. २८/०३/२०२४ अखेर करण्यात आलेली आहे. तरी वरील बससेवेचा लाभ सर्व भाविक-भक्तांनी व प्रवाशी नागरिकांनी घ्यावा असे आवाहन परिवहन महामंडळाकडून करण्यात येत आहे.

**Sd/-**
**चिफ ट्रान्सपोर्ट मॅनेजर (ऑपरेशन)**
**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**

---

दि. १९/०३/२०२४

मा. संपादक,
दैनिक ..........
यांजकडेस...

महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्ध होणेविषयी विनंती आहे.

मा. स. कळावे.

**Sd/-**
कामगार व जनता संपर्क अधिकारी
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.